गौण खनिजापासून "क" वर्ग नगरपालिका
क्षेत्रात शासनाला मिळणारे स्वामित्व धनाचे
संदर्भात नगरपालिकांना अनुदान.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
शासन निर्णय क्र : क्र. जीएनटी-१०८५/सीआर-४१/८४/युडी-१०
दि. : २१ मार्च १९८६

संदर्भ : शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. एमएमआर-१०८१/१३३४/जी-७, दि : १६ जानेवारी १९८५

**शासन निर्णय :-** राज्यातील "क" वर्ग नगरपालिकांच्या साधनसामुग्रीत वाढ करून त्यांची आर्थिक स्थिती सुधारण्याच्या दृष्टीने या नगरपालिका क्षेत्रात शासनाला गौण खनिजापासून मिळणारा महसूल या नगरपालिकांना अनुदान म्हणून देण्याबाबतचा प्रश्न शासनाकडे विचाराधीन होता. याबाबत शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. एमएमआर-१०८१/१३३४/जी-७, दि. १६ जोवारी १९८५ नुसार शासनाने असा निर्णय घेतला आहे की, "क" वर्ग नगरपालिका क्षेत्रात शासनाला गौण खनिजापासून मिळणाऱ्या स्वामित्वधन या नगरपालिकांना अनुदानाचे त्याना वित्तिय सहाय्य म्हणून देण्यात यावे. मात्र एका वेळी एकाच नगरपालिकेला या संदर्भात देण्यात येणारे अनुदान रु. १ लाखापेक्षा जास्त असू नये. या निर्णयानुसार शासनाने १९७७-१९७८ पासून "क" वर्ग नगरपालिका क्षेत्रातून वसूल झालेल्या गौण खनिजाच्या स्वामित्व धनाचे संदर्भातील महसूलाबाबतचे अनुदान देण्यास मान्यता दिलेली आहे. हे अनुदान संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, मुंबई यांनी दर वर्षी/ मागील वर्षात वसूल झालेल्या गौण खनिजाचे महसूलाची माहिती गोळा करून त्याबाबतची आवश्यक तरतूद करून जिल्हाधिकाऱ्यांमार्फत संबंधित नगरपालिकांना वितरीत करावे. याकरिता संचालक, नगरपालिका प्रशासन यांना नियंत्रक अधिकारी व सर्व जिल्हाधिकाऱ्यांना आवरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

१९७७-७८ पासून १९८४-८५ सालापर्यत शासनाने वसूल केलेल्या गौण खनिजाबाबतच्या महसुलाचे संदर्भात अनुदान देण्याकरिता रु. १० लाखाची तरतूद १९८५-८६ च्या अंदाजपत्रकामध्ये नवीन बाब सादर करून मंजूर करून घेतलेली आहे. हे अनुदान संचालक, नगरपालिका, प्रशासन यांच्या स्वाधीन करण्यात येत असून त्यांनी ती संबंधित नगरपालिकांना जिल्हाधिकाऱ्यांमार्फत तात्काळ वितरीत करावे.
याकरिता होणारा खर्च "मागणी" क्र. ८१, ३६३ स्थानिक संस्था व पंचायत राजसंस्था यांना नुकसान भरपाईच्या व अभिहस्तांतरित रकमा देणे (एक) इतर संकिर्ण नुकसान भरपाई व हस्तांतरण रकमा (दोन) इतर संकीर्ण अनुदान ३६३८०४३-४ या शीर्षाखाली खर्च दाखविण्यात यावा व तो १९८५-८६ सालाकरिता असलेल्या मंजूर तरतूदीतून भागविण्यात यावा.

हा शासन निर्णय वित्त विभागाच्या संमतीने त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र. सीआर-५७४/व्यय-११, दि. १९ मार्च १९८६ नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशाुसार व नावाने,

(शि. ह. भेंडे)
महाराष्ट्र शासनाचे उप सचिव